पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८

मा.शहर सुधारणा समिती

कार्यपत्रिका क्रमांक ६

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक - २१/०८/२०१३ वेळ दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २१/०८/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१)** मा. सुपे आशा रविंद्र - **सभापती**
२) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३) मा. ननवरे जितेंद्र बाबा

या शिवाय मा.पवार – कार्यालय अधिक्षक हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.आशा सुर्यवंशी

मा.शहर सुधारणा समितीची सभा सोमवार दिनांक २६/०८/२०१३ दुपारी ३.०० पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती -** मा.शहर सुधारणा समितीची सभा सोमवार दिनांक २६/०८/२०१३ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत आहे.

(सुपे आशा रविंद्र)
**सभापती**
मा.शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८
मा.शहर सुधारणा समिती
कार्यपत्रिका क्रमांक ६

**सभावृत्तांत**

( दिनांक २१/०८/२०१३ ची तहकूब सभा )

दिनांक - २६/०८/२०१३ वेळ दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची दिनांक २१/०८/२०१३ ची तहकूब सभा सोमवार दिनांक २६/०८/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. सुपे आशा रविंद्र- **सभापती**
२) मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३) मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
४) मा. तानाजी विठठल खाडे
५) मा.जयश्री वसंत गावडे

या शिवाय मा.जुंधारे – कार्यकारी अभियंता,मा.पवार – कार्यालय अधिक्षक हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

दिनांक ०७/०८/२०१३ व ०८/०८/२०१३ रोजी झालेल्या सभेचा ( **कार्यपत्रिका क्र.५** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – २७ विषय क्रमांक - १
दिनांक - २६/०८/२०१३ विभाग – वाहतूक नियोजन कक्ष
सूचक – मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक – मा.तानाजी खाडे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.स्था/वा.क./कावि/१४६/२०१३, दि. ३१/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पुणे शहर वाहतूक पोलिसांनी केलेल्या मागणीनुसार पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील नियोजित बी.आर.टी. मार्गातून अवैधपणे / अनधिकृतपणे संचलन करणा-या शहरातील इतर रस्त्यावर ‘ नो पार्कींग ’ झोनमध्ये उभी राहणारी व शहरात इतर ठिकाणी अवैध पार्कींग करुन वाहतूकीचे सुरळीत संचलनात अडथळा ठरणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करणेस व त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावती पुस्तकाद्वारे वसूल करुन त्यातील ५० टक्के रक्कम वाहतूक पोलिसांना वाहतूकीचे साहित्य खरेदी इ.साठी ठेवून उर्वरित ५० टक्के रक्कम महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा वाहतूक पोलिसांनी करावा. सदर प्रस्तावानुसार मनपा

रस्त्यावर अवैध पार्कींग करणा-या व ‘ नो पार्कींग ’ मध्ये उभ्या राहणा-या आणि बी.आर.टी. मार्गामधून अनधिकृतपणे संचलन करणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी आणि त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क खालीलप्रमाणे आकारणेत यावे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | विमोचन व प्रशासकीय शुल्क रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अवजड वाहने ट्रक, बस, ट्रेलर्स इ. | ५,०००/- |
| २ | रोड रोलर, इतर यंत्र सामुग्री | ३,०००/- |
| ३ | हलकी वाहने १० टनापर्यंत क्षमता | २,५००/- |
| ४ | कार, जीप इ. | २,०००/- |
| ५ | सहा आसनी रिक्षा, टेम्पो इ. | १,५००/- |
| ६ | स्वयंचलित दुचाकी वाहने | १,०००/- |

उपरोक्त प्रमाणे वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावतीपुस्तकाद्वारे वसुल करण्यासाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २०८ अन्वये मनपाचे अधिकार वाहतूक पोलिसांना प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुपे आशा रविंद्र )**
**सभापती**
मा.शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ८०५ /२०१३
दिनांक - ३०/०८/२०१३

सही/-
**कार्यालय अधिक्षक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.